मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिका निवडणुका पुन्हा लांबणीवर!

## येत्या 4 मार्चला सुनावणी : महानगरपालिका इच्छुकांचा हिरमोड कायम

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेवर आता ४ मार्च रोजी सुनावणी होणार आहे. त्यामुळे राज्यातील महापालिकेच्या रखडलेल्या निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्या आहेत. त्यामुळे इच्छुकांचा हिरमोड झाला आहे.




महापालिका निवडणुका रखडल्याने राज्यातील मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवडसह तब्बल २३ महापालिकांवर प्रशासकीय राजवट आहे. प्रभाग रचना, लोकसंख्येत १० टक्के वाढ धरून निश्चित केलेली सदस्यसंख्या आणि ओबीसी आरक्षण यावरून तब्बल ५७ वेगवेगळ्या याचिका सुप्रीम कोर्टात दाखल आहेत. त्यावर एकत्रित सुनावणी २२ जानेवारी रोजी होणार होती. मात्र, बुधवारी होणाऱ्या सुनावण्यांच्या यादीत या याचिकांचा समावेश नव्हता. त्यानंतर २८ जानेवारी रोजी सुनावणी नाही. पुढील सुनावणी २५ फेब्रुवारी म्हणजे आज होती. पण आजही सुनावणी झाली नाही. त्यामुळे या याचिकेवर आता ४ मार्च रोजी सुनावणी होणार आहे.

### निवडणुका सप्टेंबर- ऑक्टोबरचा शक्य..

» तसेच, प्रभाग रचना करणे, त्यावर हरकती-सूचनांची प्रक्रिया आणि अंतिम प्रभाग रचना यासाठी किमान ९० दिवसांचा कालावधी लागतो. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयात फेब्रुवारी अखेरपर्यंत निवडणुकांसंदर्भात निकाल न लागल्यामुळे एप्रिल-मे महिन्यात निवडणुका घेणे शक्य होणार नाही. त्यामुळे या निवडणुका थेट सप्टेंबर-ऑक्टोबरमध्येच घ्याव्या लागतील, अशी स्थिती आहे.

महाविकास आघाडीच्या राजवटीत मुंबई वगळता अन्य महापालिकांसाठी ३ सदस्यीय प्रभाग रचना करण्यात आली व त्यानुसार आरक्षण सोडत काढण्यात आली होती. मात्र, महायुतीचे सरकार आल्यानंतर पुन्हा ४ सदस्यीय प्रभाग रचना करण्यात आली. ही प्रभाग रचना आता नव्याने करावी लागेल. २०१७ च्या रचनेनुसार प्रभाग रचना कायम राहिली तरी पुणे महापालिकेत २०१७ नंतर उरुळी देवाची व फुरसुंगी वगळून ३२ गावांचा समावेश झाला आहे. त्यामुळे किमान पुणे महापालिकेत तरी नव्याने प्रभाग रचना करावी लागणार आहे.

# 1 मार्चपासून जापनीज एन्सेफलायटीस प्रतिबंधक लसीकरण मोहीम

## पालक आणि शाळांना सहकार्याचे महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलत, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे १ मार्च २०२५ पासून जापनीज एन्सेफलायटीस अर्थात 'जेई' प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे.

'जेई' हा विषाणूजन्य आजार असून, तो प्रामुख्याने १५ वर्षांखालील मुलांना होतो. या आजारामुळे गंभीर मज्जातंतू विकार होण्याची शक्यता असते, तसेच याचा मृत्यूदरही अधिक आहे. 'जेई' सिंड्रोम हा देशातील सार्वजनिक आरोग्य समस्यांपैकी एक आहे. कारण यामुळे मृत्यूचे प्रमाण सुमारे ३० टक्के आहे, आणि ३०-४० टक्के बरे झालेल्या मुलांमध्ये विशिष्ट परंतु मज्जातंतूशी संबंधित अपंगत्व आयुष्यभर राहते. त्यामुळे या आजारापासून बचावासाठी लसीकरण करण्याचे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे करण्यात आले आहे.

### लसीकरण मोहीमेचे स्वरूप..

१ मार्च २०२५ पासून संपूर्ण पिंपरी चिंचवड शहरात ही मोहीम राबविली जाणार.

१ ते १५ वर्षे वयोगटातील सर्व मुलांचे शाळा आणि समाज स्तरावर मोफत लसीकरण करण्यात येणार.

राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमाअंतर्गत ही लस सुरक्षित आणि प्रभावी आहे.




### शाळा आणि पालकांनी सहकार्य करण्याचे आवाहन

सोमवारी (२४ फेब्रुवारी) पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकीय विभागातर्फे याबाबत बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीमध्ये शाळांचे आणि पालकांचे सहकार्य आवश्यक असल्याचे मत उपस्थितांनी मांडले. तसेच विद्यार्थ्यांना जेई प्रतिबंधक लसीकरणाचे महत्त्व पटवून द्यावे, पालकांसाठी जनजागृती सभा आयोजित कराव्यात, शाळेतील विद्यार्थ्यांची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांना उपलब्ध करून द्यावी, लसीकरण सत्रासाठी जागा आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, सर्व विद्यार्थ्यांनी लस घेतली आहे याची खात्री करावी, अशा विविध सूचना देण्यात आल्या. ही बैठक महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे यांच्या सूचनेनुसार, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयाचंद्र दादेवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोरी नलावडे, सर्व्हेलन्स मेडिकल ऑफिसर डॉ. चेतन खाडे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. वर्षा डांगे आणि इतर नोडल अधिकारी उपस्थित होते.

> जेई प्रतिबंधक लसीकरण ही सार्वजनिक आरोग्यासाठी महत्त्वाची मोहीम आहे. पालकांनी व शिक्षकांनी या उपक्रमात सक्रीय सहभाग घ्यावा आणि प्रत्येक बालकाला लसीकरण मिळावे, यासाठी प्रयत्न करावेत. संपूर्ण समाजाने या मोहिमेस सहकार्य करून आपल्या पुढील पिढीचे आरोग्य सुरक्षित करणे आवश्यक आहे.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी- चिंचवड महानगरपालिका.**

# रस्त्यावर चालणारा प्रत्येक जण गुन्हेगार नाही

## नागरिकांशी सौजन्याने वागा : पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांचे आदेश



**पुणे | प्रतिनिधी**

‘रस्त्यावर चालणारा प्रत्येक जण गुन्हेगार नाही. वाहतूक पोलिसांनी नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई करावी. मात्र, कारवाई करताना वादाचे प्रसंग टाळावेत. नागरिकांशी सौजन्याने वागावे’, असे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सोमवारी दिले. मुंबईच्या धर्तीवर पुणे पोलीस दलात वाहतूक शाखेत काम करणाऱ्या पोलिसांसाठी प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

पुणे श्रमिक पत्रकार संघाकडून पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याशी वार्तालाप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनीत भावे, सरचिटणीस मीनाक्षी गुरव उपस्थित होते. पोलीस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले, ‘पुणे शहरातील वाहतूक समस्या सोडविण्यसाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत. महापालिका, तसेच विविध शासकीय यंत्रणांशी समन्वय साधून वाहतूक विषय सुधारणा करण्यात येत आहेत. पुणे शहरात विविध वाहतूक विषयक कामे, तसेच पायाभूत सुविधांसाठी पोलिसांना एक हजार कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात आला.नवीन भरती प्रक्रियेतील .८०० पोलीस कर्मचाऱ्यांचे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले. अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसाठी ४३५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करुन देण्यात आला आहे. नवीन सात पोलीस ठाण्याचे उद्घाटन करण्यात आले. वाहतूक शाखा म्हणजे पुणे पोलिसांचा जनसंपर्क कक्ष आहे. रस्त्यावरून जाणारा वाहनचालक किंवा नागरिक गुन्हेगार नाही. याची जाणीव पोलिसांनी ठेवावी. कारवाई करताना वादाचे प्रसंग टाळावेत. नागरिकांशी सौजन्याने वागावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.’

मुंबई पोलीस दलात वाहतूक शाखेत नियुक्ती होण्यापूर्वी पोलिसांना प्रशिक्षण देण्यात येते. पुण्यातही वाहतूक पोलिसांना प्रशिक्षण देण्यसाठी पोलीस दलाअंतर्गत संस्था सुरू करण्यात येणार आहे. प्रशिक्षण संस्थेसाठी जागेचा शोध सुरू आहे. मात्र, पोलिसांना आतापासून प्रशिक्षण देण्यास सुरुवात झाली असून, पहिल्या तुकडीतील ५० पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे, असे त्यांनी नमूद केले.

**पोलीस आयुक्त काय म्हणाले?**

गंभीर गुन्हा घडल्यानंतर आठ मिनिटात पोलीस घटनास्थळी (रिस्पॉन्स टाइम)

रिस्पॉन्स टाइम पाच मिनिटावर आणण्याचा प्रयत्न

तक्रार आल्यास गुंडांविरुद्ध कठोर कारवाई

अवैध धंद्यांवर कठोर कारवाई

खून, खुनाच्या प्रयत्नात घट

जमिनीवरचे ताबे, आर्थिक फसवणूक प्रकरणात सामान्यांना न्याय देण्याचा प्रयत्न

कोयता गँगवर अस्तित्वात नाही

### ‘आका’वरही कारवाई

» पोलिसांवर दबाब आणण्याचा प्रयत्न, तसेच गुन्हेगारांना पाठबळ देण्याचा कोणी प्रयत्न करत असेल, तर ते खपवून घेतले जाणार नाही. गुन्हेगारांच्या पाठीशा असणाऱ्या ‘आकां’वरही कारवाई करू, असे त्यांनी स्पष्ट केले. समाज माध्यमात दहशत माजविणाऱ्या चित्रफिती प्रसारित केल्याप्रकरणी गेल्या वर्षी २० ते २५ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करुन त्यांना अटक केली. गुन्हेगारीचे उद्दातीकरण केल्यास कठोर कारवाई करू, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.

### गुन्हा केला तर खैर नाही

» वाहनांची तोडफोड, दहशत माजविणाऱ्या गुंडांविरुद्ध पोलिसांकडून कारवाई करण्यात येत आहे. ‘मकोका’, ‘एमपीडीए’कायद्यान्वये सराइतांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. प्रतिबंधात्मक कारवाई करूनही सराइतांमध्ये सुधारणा होत नसेल तर पुढच्या सात पिढ्या विसरणार नाही, अशी कठोर कारवाई करु, असा इशारा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला.

# अतिक्रमणे हटवा, स्वच्छतागृहांची संख्या वाढवा

## महापालिकेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या जनसंवाद सभेत नागरिकांच्या विविध 98 तक्रारी



**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या जनसंवाद सभेत आज ९८ तक्रार वजा सूचना नागरिकांनी मांडल्या. शहरातील नागरीक आणि प्रशासन यांच्यात सुसंवाद राखण्यासाठी तसेच तक्रारींचे निवारण जलद गतीने करण्यासाठी जनसंवाद सभेचे आयोजन महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या सोमवारी सर्व क्षेत्रीय कार्यालयात समन्वय अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली करण्यात येते. या जनसंवाद सभेचे अध्यक्षस्थान नेमण्यात आलेल्या समन्वय अधिकाऱ्यांनी भूषवले.

काल झालेल्या जनसंवाद सभेत नागरीकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून तक्रारी वजा सूचना मांडल्या. यामध्ये अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयात अनुक्रमे ८,१४,४,२६,८,८,१३ आणि १७ याप्रमाणे एकुण ९८ तक्रारी वजा सुचना नागरिकांनी मांडल्या.

या जनसंवाद सभेत फुटलेली ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे, नवीन ड्रेनेज लाईन टाकणे, नवीन डीपी उभारणे, अनधिकृत आरओ प्लांट बंद करणे, रस्त्यावरील खड्डे बुजवणे, रस्त्याचे डांबरीकरण करणे, विविध ठिकाणी साचलेला कचरा वेळोवेळी उचलणे, कचरावेचक गाड्या वेळेवर पाठवणे, राडारोडा उचलणे, स्वच्छतागृहांची संख्या वाढवणे, अतिक्रमण हटवणे, अनधिकृत पत्राशेड बांधकामावर कारवाई करणे या तक्रारी वजा सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या.

जनसंवाद सभेत येणाऱ्या नागरिक व तक्रारींची संख्या अधिक असल्यामुळे सभेच्या कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी कामकाजाचे विनियमन करण्यासाठी परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते. या परिपत्रकाद्वारे सर्व नागरिकांची आसन व्यवस्था प्रतिक्षा कक्षात करावी, नागरिकांच्या तक्रारी नमूद करण्यासाठी अर्जाचा नमुना भरून घ्यावा, प्रत्येक व्यक्तीसाठी वेळ मर्यादा निश्चित करण्यात आली असून नागरिकाची तक्रार समजावून घेतल्यानंतरच दुसरी तक्रार घेण्यात यावी, अधिकारी कर्मचारी यांनी जनसंवाद सभेत सुनिश्चित वेळेवर उपस्थित राहण्याची दक्षता घ्यावी, तक्रारदार यांचे नाव गोपनीय राहील याची दक्षता घ्यावी, नागरिकांना जनसंवाद सभेचे व्हिडीओ चित्रीकरण करता येणार नाही, जनसंवाद सभेतीलअहवाल आणि माहिती पत्रकारांना जनसंवाद सभा संपल्यानंतर देण्यात यावी, जनसंवाद सभा झाल्यानंतर नागरिकांचा अभिप्राय नोंदवून घेऊन भविष्यातील सुधारणांबाबत आढावा घ्यावा असे आदेश निर्गमित करण्यात आले होते त्याप्रमाणे कार्यवाही चालु करण्यात आली आहे.

# अखंडित वीजपुरवठ्याबाबत उद्योजक अंधारातच

## जागेअभावी उपकेंद्र उभारणीस मिळेना मुहूर्त; मोशी, भोसरी, इंद्रायणीनगरातील लघु व मध्यम उद्योजकांना झटका

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी, भोसरी आणि इंद्रायणीनगर परिसरातील उद्योजकांना अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी असलेला उपकेंद्र विस्तारीकरणचा प्रस्ताव मंजूर असूनही जागेअभावी हा प्रकल्प अद्यापही उभा राहू शकला नाही. त्यामुळे येथील लघु व मध्यम उद्योजकांची अखंडित वीजपुरवठ्याबाबतची आशा अंधारात असून, त्यांना कोट्यवधींचा फटका बसत आहे. उपकेंद्राचे काम लवकर पूर्ण करून ते सरू करण्याची मागणी लघुउद्योग संघटनेने केली आहे.



औद्योगिक शहर म्हणून नावारुपास आलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात 18 हजार मोठे व लघु व मध्यम उद्योजक आहेत. काही दिवसांमध्ये त्यात वाढ झाली आहे. सध्या वापरात असलेल्या 45 वर्षांपूर्वीच्या वीजवाहिन्यांवरचा भार वाढतो आहे. एका फिडरवर सुमारे चारशे कंपन्यांचा भार आहे. शंभर कंपन्यांचा अतिरिक्त भार होत असल्याने वारंवार वीज पुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे एका वेळी पुरवठा बंद झाल्याने उद्योजकांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असल्याच्या तक्रारी आहेत.

सद्यस्थितीत औद्योगिक परिसराला सध्या बालाजीनगर, सेंच्युरी एंका, इंद्रायणीनगर, टाटा मोटर्स, तळवडे आदी भागातील वीज केंद्रातून विद्युत पुरवठा केला जातो. या केंद्राची क्षमता दिवसेंदिवस कमी होत आहे. कंपन्यांचा अतिरिक्त मागणी वाढत असल्याने खंडित वीज पुरवठ्यावर मार्ग काढण्यासाठी तीन ठिकाणच्या उपकेंद्रातील मेगावॅटची मर्यादा वाढविणे प्रस्तावित आहे. मात्र उद्योजकांच्या या मागणीला केराची टोपली दाखवली जाते. वारंवार होणाऱ्या खंडित वीज पुरवठ्याने उद्योजक त्रस्त आहेत. कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत आहे. ही उपकेंद्रे कार्यान्वित झाल्यास परिसरातील सुमारे 18 हजार उद्योजकांना आणखीन विस्तार करणे शक्य होईल. सेंच्युरी एंका येथे 50 मेगावॅटचे दोन ट्रान्सफार्मर बसविणे प्रस्तावित आहे. इंद्रायणीनगर येथेही 50 मेगावॅटचे उपकेंद्र होणार आहे. तसेच टेल्को कंपनीचे सध्या 50 मेगावॅटचे उपकेंद्र आहे. त्या ठिकाणी 100 मेगावॅटचे उपकेंद्र उभारावे अशी मागणी उद्योजक करत आहेत.

### जागेसाठी करावी लागते शोधाशोध

» शहरातील एमआयडीसी कंपन्यांची वाढती वीजमागणी आणि त्याचा ताण मोठा असल्याने उपकेंद्र होणे गरजेचे आहे. त्यासाठी महापारेषण कडून महापालिकेकडे जागेची मागणी केली होती. त्याबाबत सहा महिन्यांपासून बैठका झाल्या. मात्र त्याबाबत पिंपरी चिंचवड महापालिकेची कडून एकमत होऊ शकले नाही. एवढ्या मोठ्या प्रमाणात जागा देणे शक्य नसल्याने महापालिकेचे म्हणणे आहे. मोशी सफारी पार्क येथे ही जागेची मागणी केली असून त्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

त्याबाबत महावितरणने मंजूरी देखील दिली आहे. महापारेषणने उपकेंद्र उभारायचे आहे. यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेने पुढाकार घेऊन जागा उपलब्ध करणे आवश्यक आहे.

### जुन्या विद्युतवाहिन्यांवर अतिरिक्त भार

शहरांमध्ये औद्योगिक त्याचप्रमाणे सोसायटी भागामध्ये यापूर्वी उभारण्यात आलेल्या अनेक केबल्स या जुन्या झालेल्या आहेत. त्यावर अतिरिक्त भार पडतो आहे. नव्याने टाकण्यात येणाऱ्या वाहिन्यांची कामे रखडली आहेत. स्थानिक नागरिक या कामाला विरोध करतात. परिणामी, हे काम पूर्ण होऊ शकत नाही. येत्या काळामध्ये हे सुद्धा काम हाती जिकरीचे ठरणार आहे.

> तळवडे, चऱ्होली, आणि मोशी येथे 220 केव्ही अती उच्च दाबाचे उपकेंद्र उभारणीला महावितरणकडून मंजूरी दिली आहे. उपकेंद्र उभारण्याचे काम महापारेषण करते. त्याबाबत संवाद सुरू आहे.
>
> **- निशिकांत राऊत, जनसंपर्क अधिकारी, महावितरण**

# हॅप्पीनेस स्ट्रीट उपक्रमातील 'WALKATHON'ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## माजी उपमहापौर डब्बू आसवानी यांनी पिंपरी येथे 'हॅप्पीनेस स्ट्रीट' हा उपक्रम राबविला

**पिंपरी | प्रतिनिधी**

माजी उपमहापौर डब्बू आसवानी यांनी पिंपरी येथे 'हॅप्पीनेस स्ट्रीट' हा उपक्रम राबविला आहे. सदर उपक्रम २९ डिसेंबर २०२४ ते २३ फेब्रुवारी २०२५ पर्यंत दर रविवारी पिंपरी येथील ओपन लॉन येथे राबविल गेला. 'फिट राहा, आनंदी राहा व संपर्कात राहा, असा संदेश देत हा उपक्रम संपूर्ण करण्यात आला.



या उपक्रमाबाबत बोलताना डब्बू आसवानी म्हणाले की, लहान मुलांसह वयस्कर व्यक्तींनी आनंदी राहावे, विविध खेळाचा आनंद घ्यावा, याकरिता या हॅप्पीनेस स्ट्रीट उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमात लहान मुलांसाठी व युवक-युवतींसाठी तसेच वयोवृद्ध व्यक्तिसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले आहे.

मनुष्याचे जीवन निरोगी राहण्यासाठी, आयुष्यात खेळांचा समावेश असणे आवश्यक असते. लहान-मोठे वृद्ध सर्वांच्याच जीवनात विविध खेळाचे अनन्य साधारण महत्व असते, आणि यामुळेच पिंपरीमध्ये 'हॅप्पीनेस स्ट्रीट' नावाचे उपक्रम राबवित आहोत. या उपक्रमाच्या अंतर्गत ४० विविध खेळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

या उपक्रमात सर्व वयोगटातील नागरिकांचा सहभाग पाहावयास मिळत आहे. योगा, जुंबा, लाईव्ह म्युझिक, डान्स, ड्रम, लाईव्ह शो, तसेच विविध खेळांच्या स्पर्धा यामध्ये केरम, बुद्धिबळ, रनिंग, सायकलिंग, जॅमर्स बोवलिंग असे अनेकोनेक उपक्रम या हॅप्पीनेस स्ट्रीट अंतर्गत राबविले.

तसेच दि.२३ फेब्रुवारी २०२५ रोजी या उपक्रमाचा शेवटचा रविवार होता. त्या अनुषंगाने पिंपरीनगरमध्ये ३ किमी चे 'WALKATHON' चे आयोजन केले होते. 'WALKATHON' साठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन ठेवले गेले होते. तसेच रजिस्ट्रेशनसाठी ९९ रुपये फी आकारण्यात आली होती. सदर 'WALKATHON' साठी एकूण १४७० नागरिकांचे रजिस्ट्रेशन झाले होते. रजिस्ट्रेशन केलेल्या सर्व नागरिकांना जर्सी तसेच 'WALKATHON' पूर्ण झाल्यानंतर मेडल देण्यात आले.

पिंपरी चिंचवड शहर डीसीपी भास्कर ढेरे साहेब, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष योगेश बहल, परमानंद जमतानी, माजी नगरसेवक हरेश आसवानी यांच्या उपस्थितीत 'WALKATHON' ची सुरवात झाली. 'WALKATHON' साठी जमा जालेले डोनेशन रक्कम हि जे.एमडी ग्रुप, सोफोश चाइल्ड आश्रम, अपंग आश्रम पुणे या तिन्ही संस्थाना प्रति ५० हजार रुपायचे चेक देण्यात आले.

सदर उपक्रम राबवत असताना अविनाश इसरानी, पवन भोजवानी, सुरज धरयानानी, मनीष गिरजा, मित्र परिवार तसेच प्रिशा स्कूल मेंबर, जीन मधु जुमानी, शोभा फिटनेस क्लास, गीतुज फिटनेस क्लब, लेट लूज जुंबा पलक अहुजा, टीम डान्ससेशन बाय हितेश आणि कशिश, जीन हरीश गुले, नित्या फिटनेस, विनोद डान्स अकादमी लिशा फिटनेस, किरण योगा ग्रुप, डान्स हूड बाय मेहक, जे,एमडी ग्रुप व इतर सर्व यांच्या सहकार्याने सदर उपक्रम खूप उत्सहात पार पडला.

# जेजुरी गडावर महाशिवरात्र यात्रेची तयारी

## मंदिर भाविकांना पहाटे 3 पासून ते मध्यरात्री 12 पर्यंत सुरू राहणार

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या श्री खंडोबा देवाच्या जेजुरी गडावर महाशिवरात्र यात्रेनिमित्त श्री खंडोबा मंदिर गडकोटातील त्रैलोक्य दर्शन म्हणजेच स्वर्गलिंग (शिखरलिंग), पाताळ लिंग (गुप्तलिंग), भूलोकातील (मुख्य गाभारा) शिवलिंग दर्शनाकरिता भाविकांसाठी विविध सुविधांची जय्यत तयारी श्री मार्तंड देवसंस्थानने केली आहे.



जेजुरी गडावर महाशिवरात्र उत्सवानिम्मित दरवर्षी शिखरावरील व तळघरातील शिवलिंग भाविकांना दर्शनासाठी उघडले जाते. श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी विश्वस्त मंडळाच्या नियोजनानुसार महाशिवरात्री दिवशी बुधवारी (दि. 26) त्रैलोक्य दर्शनव्यवस्था भाविकांना पहाटे 3 पासून ते मध्यरात्री 12 पर्यंत सुरू राहणार आहे.

या उत्सव कालावधीत भाविकांची गर्दी लक्षात घेता गडकोट आवारात व सज्जावर अधिकची दर्शनरांग, उन्हाची दाहकता पाहता दर्शनरांगेवर सावलीची व्यवस्था तसेच गडकोट आवारात व दर्शनरांगेत शुद्ध पिण्याचे पाणी, फॅनची व्यवस्था करण्यात आली असून, फराळाची व्यवस्था अन्नदान कक्षात करण्यात येणार आहे. शहरातील मुख्य चौकामध्ये श्री खंडेरायाच्या त्रैलोक्य दर्शनासाठी एलईडी स्क्रीनची व्यवस्था करण्यात येणार आहे. महाशिवरात्र उत्सव कालावधीत सशुल्क दर्शन बंद राहणार आहे.

भाविकांनी गर्दीचा कालावधी टाळून पर्यायी दर्शनव्यवस्थेनुसार त्रैलोक्य दर्शनासाठी येऊन मंदिर व्यवस्थापनास व पोलिस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरीच्या विश्वस्त मंडळाने केले आहे.

बनेश्वर महाशिवरात्र नियोजनाच्या पाहणीप्रसंगी नसरापूरच्या सरपंच उषा कदम, उपसरपंच सुधीर वाल्हेकर, नसरापूरचे मंडलाधिकारी प्रदीपकुमार जावळे, वन विभागाचे राम कदम, महावितरण कंपनीचे अभियंता सौरभ बराब्दे, राजकुमार कदम, रोहिदास राऊळ, आरोग्य विभागाचे निरीक्षक बाळासाहेब पिसाळ, विजय पावरा, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष पुरुषोत्तम दातार, उपाध्यक्ष हनुमंत कदम, सचिव अनिल गयावळ, विश्वस्त आबासाहेब यादव, काशिनाथ पालकर, आदी उपस्थित होते.

### बनेश्वर मंदिर मध्यरात्रीच खुले होणार

» महाशिवरात्रीला मध्यरात्री 12 वाजल्यापासूनच दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून यंदा साडेबारा वाजण्याच्या आतच शासकीय महापूजा आटोपणार आहे. त्यानंतर लगेचच मंदिर दर्शनासाठी खुले करण्याचा निर्णय बनेश्वर देवस्थान ट्रस्टने नियोजन बैठकीमध्ये घेतला आहे.

---

# कात्रज चौकातील 40 गुंठे जागा पालिकेच्या ताब्यात

## 28 वर्षापासून प्रलंबित असलेल्या जागेचे अखेर भुसंपादन : चौकातील वाहतुक कोंडी फुटण्यास मदत होणार

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील बहुचचित कात्रज चौकातील संजय गुगळे यांच्या मालकीची ४० गुंठासाठी जागेचे भुसंपादन करण्यात आले. त्यामुळे तब्बल २८ वर्षापासून प्रलंबित असलेल्या या जागेचे भुसंपादन झाले आहे. त्यामुळे कात्रज चौकातील वाहतुक कोंडी फुटण्यास मदत होणार आहे.



कात्रजच्या मुख्य चौकात सव्हनंबर १/2 संजय गुगळे यांच्या मालकीची जागा आहे. शहराच्या १९८७च्या विकास आराखडयानुसार तीस मीटर डिपी रोड आणि पार्कसाठी ६ हजार २०० चौरस मीटरसाठी बाधित होती. त्यानंतर २०१७च्या विकास आराखडयात हा रस्ता ३० मीटर ऐवजी ६० मीटरचा करण्यात आला. कात्रज कोंढवा रस्ता आणि पुणे सातारा रस्ता या दोन्ही मध्ये ही जागा बाधित होत आहे. या जागेबाबत संजय गुगळे हे उच्च न्यायालयात गेले होते. न्यायालयाने त्यांना मोबदला देण्याचे आदेश दिले होते.

त्यामुळे कात्रज चौकातील संजय गुगळे यांची जागा २०१३च्या नवीन भुसंपादन कायद्यानुसार करण्यात आले. गेल्या अनेक महिन्यापासुन या जागेच्या भुसंपादनाची प्रक्रिया सुरू होती. विशेष भूमि संपादन अधिकारी हर्षद घुले आणि अजिक्य पाटील यांनी भूसंपादन व व्यवस्थापन विभागाच्या उपायुक्त प्रतिभा पाटील यांच्याकडे जागेच्या ताब्याची कागदपत्रे दिली. यावेळी पालिकेचे उपअभियंता दिंगबर बीगर, शाखा अभियना रुपाली ढगे, आरेखक संतोष शिंदे उपस्थित होते.

### भुसंपादनासाठी दिले 21 कोटी 57 लाख

» शहरातील बहुचचित कात्रज चौकातील संजय गुगळे यांच्या मालकीच्या जागेचे भुसंपादन होण्यासाठी माजी आयुक्त विक्रम कुमार, माजी अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, पथ विभाग प्रमुख अनिरूध्द पावसकर , भुसंपादन विभागाच्या उपायुक्त प्रतिभा पाटील यांनी विशेष प्रयत्न केले. गुगळे यांच्या ४० गुंठासाठी जागेचे भुसंपादन करण्यात आले. त्यासाठी जागा मालकांला २१ कोटी ५७ लाख ६० हजार रूपये देण्यात आले.

### वाहतुक कोंडीतुन सुटका होणार

कात्रज चौकात वाहतूक कोंडी ही नित्याचीच बाब झाली आहे. या वाहतुक कोंडीने पुणेकर हैराण झाले आहेत. पण कात्रज चौकातुन कोंढवाकडे जाणारा रस्ता अत्यंत अरूद आहे. या अरूद रस्त्याचे रूंदीकरण करणे गरजचे आहे. ही जागा ताब्यात मिळाली आहे. त्यामूळे वाहतुक कोंडीतुन दिलासा मिळणार आहे.